सकाळ

# मुकुल माधव विद्यालय संस्कारपीठच

## रोहित देशपांडे : शाळेचा पंधरावा वर्धापन दिन उत्साहात साजरा

रत्नागिरी, ता. २४ : मुकुल माधव विद्यालय हे केवळ ज्ञानाचे केंद्र नसून, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवणारे संस्कारपीठ आहे. केवळ १५० विद्यार्थ्यांपासून सुरू झालेला प्रवास आज ५००हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला आहे. शाळा पंधरावा वर्धापन दिन साजरा करत आहे. या यशामध्ये शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि संस्थेचे मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन मुख्याध्यापक रोहित देशपांडे यांनी केले.

फिनोलेक्स इंडस्ट्रीजने दान केलेल्या १० एकर जागेवर मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकाराने मुकुल माधव विद्यालय सुरू झाले. त्यांनी पुढे सांगितले की, शाळेच्या स्थापनेपासून आजपर्यंत




**रत्नागिरी :** मुकुल माधव विद्यालयाची इमारत.

शिक्षण, कला, पर्यावरण, सामाजिक जबाबदारी आणि आधुनिक पायाभूत सुविधांमध्ये शाळेने उल्लेखनीय प्रगती केली आहे. शाळेमध्ये सौरऊर्जा प्रकल्प, पावसाच्या पाण्याचे संकलन, वीज प्रतिबंधक यंत्रणा आणि स्वतःचा भाजीपाला तुकडा अशा सुविधा उपलब्ध आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक शिक्षणाची अनुभूती मिळते.

शाळेचा दहावी, बारावीचा निकाल सलग १०० टक्के लागत आहे. यापूर्वी विद्यालयाने शैक्षणिक उत्कृष्टता पुरस्कार मिळाला आहे. या सर्व यशामागे आमच्या मॅनेजिंग ट्रस्टी रितू छाब्रिया यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व प्रेरणादायी मार्गदर्शन आहे. त्यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळेच मुकुल माधव विद्यालयाने यशाची शिखरे गाठली असल्याचे मुख्याध्यापक देशपांडे यांनी नमूद केले.

### ग्रीन स्कूलमध्ये नववा क्रमांक

२०२५ मध्ये भारतातील ग्रीन स्कूलमध्ये ९वा क्रमांक मिळवला असून, न्यूयॉर्क येथे होणाऱ्या ग्रीन स्कूल परिषदेत आमंत्रण मिळाले आहे. हा एक मोठा सन्मान म्हणावा लागेल. समाजसेवा व मूल्यशिक्षण हेच शाळेचे ब्रीद आहे. विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांतून सामाजिक जबाबदारीची जाणीव जोपासली आहे.